आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

३०ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुजरातमधे एकता नगर इथं विविध पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचं उद्धाटन आणि पायाभरणी

- झारखंडध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली /७४३ उमेदवार रिंगणात

- काँग्रेस नेते राहुल गांधी येत्या ६ नोव्हेंबरला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर, नागपुरात संविधान सन्मान संमेलन, तर मुंबईत जाहीर सभा

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीसोबत जाण्याचे मनसेप्रमुख राज ठाकरे यांचे स्पष्ट संकेत

- देशातल्या आठ प्रमुख क्षेत्रातल्या उत्पादनात गेल्या महिन्यात २ टक्के वाढ

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ४२७ अंकांची घसरण

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून त्यांनी आज एकता नगर इथं विविध पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचं उद्धाटन आणि पायाभरणी केली. त्यात बोन्साय गार्डन, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि उपजिल्हा रुग्णालयाचं उद्धाटन त्यांनी केलं.

त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी 'आरंभ. ६' अंतर्गत, प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या तुकडीला संबोधित केलं. यामधे भारतातल्या १६ नागरी सेवा, आणि भूतानमधल्या ३ नागरी सेवांचे ६५३ अधिकारी सहभागी झाले.

उद्या, ३१ ऑक्टोबर रोजी प्रधानमंत्री राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आयोजित समारंभात सहभागी  होतील, आणि स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहतील.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २८८ विधानसभा मतदारसंघांच्या निवडणुकीसाठीही अर्जांची छाननी आज पूर्ण होत असून, चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होतील.

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या ४३ मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली त्यानंतर या टप्प्यासाठी ७४३ उमेदवार रिंगणात उरले आहेत. तर दुसऱ्या टप्प्यातल्या २८ मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी आज पूर्ण झाली. या टप्प्यासाठी ६३४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. आता उमेदवारांना १ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत.

झारखंड विधानसभेसाठी पहिल्या टप्प्याकरता १३ नोव्हेंबरला तर दुसऱ्या टप्प्यासाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

महाविकास आघाडीत जागा वाटपावरून कोणताही वाद राहिला नसून. कोणत्याही मतदार संघात मैत्रिपूर्ण लढत होणार नाही, असा ठाम विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. ज्या मतदारसंघात मित्रपक्षांनी अर्ज दाखल केले आहेत ते दोन दिवसात चर्चा करुन मागे घेतले जातील. समाजवादी पक्षाशी सुद्धा चर्चा सुरु असून त्यावरही लवकरच निर्णय होईल, असं त्यांनी सांगितलं.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी येत्या ६ नोव्हेंबरला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. सकाळी नागपूर इथं संविधान सन्मान संमेलन आयोजित केलं असून, संध्याकाळी मुंबईत बीकेसीमध्ये महाविकास आघाडीची गॅरंटी जाहीर केली जाणार आहे. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते शरद पवार, आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी दिली. महायुती सरकारनं धनगर समाजाची फसवणूक केल्याचा आरोप करत भाजपाच्या उपाध्यक्ष डॉ. अर्चना पाटील यांनी यावेळी काँग्रेसमधे प्रवेश केला.

**<><><><><><>**

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचंच सरकार येईल आणि मनसे या सरकारचा भाग असेल असा विश्वास मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आज एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना व्यक्त केला. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार येईल, असं तीन महिन्यांपूर्वी वाटत होतं, मात्र हरियाणाच्या निवडणुकीनंतर चित्र बदललं आहे. आपल्या साथीनं भाजपाचा मुख्यमंत्री होईल, असं राज ठाकरे म्हणाले.

**<><><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या **लातूर आणि धाराशिव** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

देशाच्या आठ प्रमुख क्षेत्रांतील उत्पादनात चालू वर्षात गेल्या महिन्यात दोन टक्क्यांची वाढ नोंदवल्याची माहिती वाणिज्य मंत्रालयानं प्रसिद्ध केली. या आर्थिक वर्षात एप्रिल ते सप्टेंबर काळात या प्रमुख क्षेत्रांतील वाढ ४ पूर्णांक २ दशांश टक्के इतकी होती.

सिमेंट, रिफायनरी उत्पादन, कोळसा,खते आणि स्टील उत्पादनात गेल्या महिन्यात चांगली वाढ झाली. गेल्यावर्षीच्या तुलनेत सिमेंट क्षेत्रातील उत्पादनात ७ पूर्णांक १ दशांश टक्के , रिफायनरीत ५ पूर्णांक ८ दशांश टक्के वाढ झाली आहे. कोळसा क्षेत्रातील वाढ २ पूर्णांक ६ दशांश टक्के तर खत क्षेत्रातील वाढ १ पूर्णांक ९ दशांश टक्के आणि स्टिल क्षेत्रात गेल्यावर्षीच्या तुलनेत १ पूर्णांक ५ दशांश टक्के वाढ नोंदवली आहे.

दरम्यान, गेल्यावर्षी याच महिन्याच्या तुलनेत यावर्षी कच्च्या तेलाच्या उत्पादनात ३ पूर्णांक ९ दशांश टक्के घट झाली आहे. नैसर्गिक गॅस उत्पादनातही १ पूर्णांक ३ दशांश टक्के आणि वीज क्षेत्रात अर्ध्या टक्क्यानं घट नोंदवण्यात आली आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजारात आज दिवसभर चढ-उताराचं वातावरण राहिलं. बाजार बंद होताना शेअर बाजाराचा सेन्सेक्स ४२७ अंकांनी घसरला आणि ७९ हजार ९४२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १२६ अंकांची घसरण नोंदवत २४हजार ३४१ अंकांवर बंद झाला.

ग्राहकोपयोगी वस्तू वगळता, आज बहुतेक सर्वच क्षेत्रांच्या समभागांनी घसरण नोंदवली. बँकिंग, फार्मा  आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे समभाग आज सर्वात जास्त दबावाखाली दिसून आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिवाळीच्या पूर्वसंध्येला भारतासह जगभरात वसलेल्या देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

सर्वांनी प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करत, निरोगी, समृद्ध आणि जबाबदार समाज घडवण्याचा संकल्प करू या असं आवाहन राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशातून केलं आहे.

**<><><><><>**

नाविन्य आणि तंत्रज्ञानाचा विचार केला जातो तेव्हा भारतीय तरुणांची  गणना सर्वोत्कृष्टांमध्ये केली जाते, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गिटहब चे सीईओ थॉमस डोमके यांची समाजमाध्यमावरील पोस्ट शेअर करताना त्यांनी हे नमूद केलं आहे.

थॉमस डोमके यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये भारतातल्या तंत्रज्ञान विकसकांची प्रशंसा केली आहे. ही विकसकांची संख्या वाढत असून टेक टायटन म्हणून जागतिक पातळीवर ते स्वःताची ओळख निर्माण करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**<><><><><><>**

केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्‌डा यांनी उद्या साजऱ्या होणाऱ्या जागतिक एकता दिनानिमित्त आज सकाळी नवी दिल्ली इथं एकतेची शपथ दिली. यावेळी आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शपथ घेतली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी जागतिक एकता दिवस साजरा केला जातो.

**<><><><><><>**

केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी आज सौदी अरेबियात रियाधमध्ये सर्वसमावेशक राजनैतिक उपक्रमाची सुरुवात केली. ते आज आठव्या ‘फ्युचर इन्व्हेस्टमेंट इनिशिएटिव्ह’, या भविष्यातल्या गुंतवणूक उपक्रमांबाबतच्या परिषदेत सहभागी झाले. त्यांनी रियाधमध्ये लुलू हायपरमार्केटमध्ये आयोजित लुलु वाली दिवाळी या कार्यक्रमाचं त्यांनी उद्घाटन केलं. या दौऱ्यादरम्यान ते सौदी अरेबियाच्या ऊर्जा मंत्र्यांसोबत धोरणात्मक भागीदारी विषयी बैठक घेणार आहेत. तसंच सौदी अरेबियाच्या उद्योग आणि खनिज संसाधन मंत्री बंदर अल खोरायेफ आणि गुंतवणूक मंत्री खालिद अल-फलिह यांच्याशी द्विपक्षीय चर्चाही करणार आहेत.

**<><><><><><>**

दिवाळीच्या पूर्वसंध्येला आज अयोध्येमध्ये भव्य दीपोत्सव आयोजित करण्यात आला आहे. राम मंदिराच्या उभारणी नंतर अयोध्येतला हा पहिलाच दीपोत्सव आहे. ‘राम की पाडी’ सह, अयोध्येतल्या ५५ घाटांवर २५ लाखांपेक्षा जास्त दिवे प्रज्वलित करून, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवण्याचं  उत्तरप्रदेश सरकारचं

उद्दिष्ट आहे. या दीपोत्सवाचं निरीक्षण करण्यासाठी गिनीज बुकचं पथकही अयोध्येत उपस्थित आहे.

<><><><><>

भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू एबडेन ही जोडी पॅरिस मास्टर्स टेनिस स्पर्धेतल्या पुरुष दुहेरीच्या उपांत्य पूर्व फेरीत दाखल झाली आहे. बोपण्णा आणि एबडेन या जोडीनं काल झालेल्या उपउपांत्य फेरीत  जर्मनीच्या ॲलेक्झांडर ज्युरेव आणि ब्राझीलच्या मार्सेलो मेलो यांचा ६-७,७-६ असा पराभव केला.

<><><><><>

दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या गोलंदाजी क्रमवारीत पुन्हा अव्वल स्थान मिळवलं आहे. त्यानं जोश हेझलवूड, जसप्रीत बुमराह आणि रविचंद्रन अश्विन यांना मागं टाकत अव्वल स्थान पटकावलं आहे.

<><><><><>

तामिळनाडू, पुडुचेरी, केरळ, कराईकल आणि माहे मध्ये पुढचे तीन दिवस, तर दक्षिण कर्नाटकमध्ये उद्या जोरदार पावसाची शक्यता असून, तामिळनाडू, आंध्रप्रदेशचा किनारपट्टी भाग, यानम आणि तेलंगणामध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//